**ठळक बातम्या**

- प्रयागराजमध्ये महाकुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ७ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचं भूमिपूजन आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार

- राज्यसभेत अध्यक्ष जगदीप धनखड यांच्यावरच्या अविश्वास ठरावाच्या मुद्द्यावरून झालेल्या गदारोळामुळे आजही कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- संसदेवरच्या दहशतवादी हल्ल्याला आज २३ वर्ष पूर्ण, शहिदांना देशभरातून आदरांजली

**आणि**

- तमिळनाडूमधे दिंडीगुल इथं रुग्णालयात लागलेल्या आगीत एका बालकासह सहा जणांचा मृत्यू,

**<><><><><>**

उत्तर प्रदेशमधल्या प्रयागराजमध्ये पुढच्या वर्षी होत असलेल्या महाकुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज ७ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांचं भूमिपूजन करणार आहेत. या प्रकल्पांमध्ये 10 नवीन पूल तसेच उड्डाणपूल, कायमस्वरूपी घाट आणि नदीसमोरील रस्त्यांचे बांधकाम या विकास कामांचा यात समावेश आहे.

प्रयागराज आणि आजूबाजूच्या परिसरातील प्रवास यामुळे सुलभ होण्यास मदत होणार आहे. प्रक्रिया न केलेले सांडपाणी गंगेत वाहून जाण्यापासून रोखण्याच्या उद्देशाने एका प्रकल्पाचं लोकार्पणही मोदी यांच्या हस्ते होणार आहे. हा महाकुंभमेळा पुढील वर्षी १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी या कालावधीत होणार असून प्रधानमंत्री महाकुंभ स्थळालाही भेट देणार आहेत. या भेटीदरम्यान ते एका चॅटबॉटचं उद्घाटनही करणार आहेत. गंगा, यमुना आणि सरस्वती नद्यांच्या संगमावर विधीवत पूजा करून आणि तिथलं दर्शन घेऊन मोदी आपल्या दौऱ्याची सुरुवात करत आहेत.

**<><><><><>**

राज्यसभेत आजही अध्यक्ष जगदीप धनखड यांच्यावरच्या अविश्वास ठरावाच्या मुद्द्यावरून विरोधकांनी प्रचंड गदारोळ केला. काँग्रेसप्रणित विरोधी पक्षांनी हा अविश्वास ठराव आणला असून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये यावरून आजही खडाजंगी झाली. गेल्या तीस वर्षात आणि आपल्या कार्यकाळात राज्यसभेच्या अध्यक्षांच्याविरोधात अशा किती नोटीस आल्या आहेत ते सभागृहासमोर यावं असं धनखड म्हणाले. विरोधी सदस्यांच्या वर्तनावर आणि त्यानी सभागृहाबाहेर केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यावर त्यांनी नाराजी व्यक्त केली. विरोधकांना त्यांच्याविरोधात प्रस्ताव आणण्याचा अधिकार आहे मात्र त्यांनी संविधानाचं उल्लंघन केलं आहे असं ते म्हणाले. विरोधकांचा ठराव १४ दिवसांनी घेतला जाईल, विरोधक वेळोवेळी घटनात्मक कामकाजाला टाळून अध्यक्षांच्या विरोधात मोहीम

राबवत आहेत, अशी टीका त्यांनी केली. आपण नेहमीच विरोधकांप्रती आदरभावना दाखवली आहे, विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी आपल्याशी चर्चा करावी, असं त्यांनी सांगितलं. मात्र तरीही गोंधळ सुरूच राहिल्यानं सभागृहाचं कामकाज सोमवार सकाळपर्यंत स्थगित करण्यात आलं.

**<><><><><>**

देशाचं संविधान भारतीय नागरिकांनी तयार केलं असून ते भारताच्या मूल्यांवर आधारित आहे, असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी आज लोकसभेत सांगितलं. देशानं राज्यघटना स्वीकारली त्या घटनेला ७५ वर्षं पूर्ण होत असल्यानिमित्त लोकसभेत आजपासून विशेष चर्चा सुरु झाली. या चर्चेला सुरुवात करताना संरक्षण मंत्री बोलत होते. संविधान ही काही एका पक्षाची देणगी नसून काही पक्ष त्याचं श्रेय स्वतःकडे घेऊ पाहत आहेत, अशी टीका त्यांनी यावेळी केली. आपलं सरकार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास या मूलमंत्रानुसार आणि संविधानात अभिप्रेत असलेल्या तत्त्वांनुसार कार्य करत आहे, असं ते म्हणाले. आपलं संविधान प्रगतीशील, सर्वसमावेशक आणि परिवर्तनशील आहे, गरीब कुटुंबात जन्म घेतलेली व्यक्ती देखील आज देशाच्या उच्च पदावर जाऊ शकते ही संविधानाची ताकद आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

संसदेवरच्या दहशतवादी हल्ल्याला आज २३ वर्ष पूर्ण होत आहेत. १३ डिसेंबर २००१ रोजी पाकिस्तानातून आलेल्या पाच दहशतवाद्यांनी संसद भवन परिसरात घुसून गोळीबार केला होता. संसदेचं रक्षण करताना वीरमरण आलेले सुरक्षा रक्षक आणि प्राण गमावलेल्यांना आज देशभरातून आदरांजली अर्पण करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या हल्ल्यात प्राणांची आहुती देणाऱ्या शूरांना आदरांजली वाहिली आहे.

हुतात्मा झालेल्या सुरक्षा रक्षकांचं साहस आणि निःस्वार्थ सेवा देशाला कायमच प्रेरणा देत राहील, दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी भारत वचनबद्ध असून दहशतवादी गटांच्या विरोधात देश नेहमीच एकत्रित लढा देईल, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. या शहीदांचं सर्वोच्च बलिदान देशाला कायम प्रेरणादायी असेल, देश सदैव त्यांचं दुर्दम्य साहस आणि निष्ठेचं कृतज्ञतेनं स्मरण करेल, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

यानिमित्त संसद भवनात आज उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, केंद्रीय मंत्रिमंडळातले मंत्री, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी पुष्पांजली अर्पण केली. यावेळी हल्ल्यात शाहिद झालेल्यांचे कुटुंबीय देखील उपस्थित होते.

**<><><><><>**

संसद हल्ल्यातल्या शहिदांना आज संसदेच्या दोन्ही सभागृहात आदरांजली वाहण्यात आली. दोन्ही सदनात मौन पाळून शहिदांना अभिवादन करण्यात आलं. शहिदांचं साहस आणि समर्पण वृत्तीला देश कधीच विसरू शकणार नाही असं लोकसभेचं सभापती ओम बिर्ला यांनी सांगितलं. दहशतवादाचा मुकाबला करण्याच्या देशाच्या अढळ संकल्पाचा त्यांनी पुनरुच्चार केला. तर दहशतवाद्यांचा मनसुबा उधळून लावत आपल्या शूर सुरक्षारक्षकांनी अतुलनीय साहस दाखवलं असं राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी सांगितलं. आपलं ऐक्य, न्याय आणि स्वातंत्र्य यांच्या रक्षणासाठी नागरिकांनी कायम एकजुटीनं राहावं असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भारतीय लष्कराचे वज्र कॉर्प्स आज अमृतसरमध्ये विजय दिवस साजरा करत आहे. १६ डिसेंबर १९७१ रोजी भारताने पाकिस्तानविरोधात विजय मिळवला, त्या विजयाच्या स्मरणार्थ विजय दिवस साजरा केला जातो. या विजयानंतर स्वतंत्र बांगलादेश उदयास आला. ५३ व्या विजय दिवसानिमित्त आज आणि उद्या पंजाब स्टेट वॉर हिरोज मेमोरिअल आणि म्युझियम इथं शस्त्रास्त्र आणि युद्ध सामग्रीचे प्रदर्शन आयोजित केले आहे.

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिन सोहळ्याचा एक भाग म्हणून १० ते १३ डिसेंबर दरम्यान संरक्षण मंत्रालयानं माय गव्हर्नमेंट प्लॅटफॉर्म वर एक  प्रश्न मंजुषा  आयोजित

केली आहे. Quiz on Cultural Heritage and Traditions of India या नावानं माय गव्हर्नमेंट प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन घेतल्या जाणार असलेल्या प्रश्नमंजुषेबाबतचा तपशील www.mygov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**<><><><><>**

तमिळनाडूमधील दिंडीगुल इथे एका रुग्णालयात काल रात्री लागलेल्या आगीत एका बालकासह सहा जणांचा मृत्यू झाला, तर २६ जण जखमी झाले आहेत. जखमींमध्ये तीन जण अतिदक्षता विभागात असून अन्य रुग्णांवर उपचार करून सोडून देण्यात आले. रुग्णालयाच्या तळ मजल्यावर लागलेली ही आग शार्ट सर्किटमुळे लागल्याचे समजते. तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन यांनी आगीत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना तीन लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपये मदत देण्याचे जाहीर केले आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये आज सुरक्षादलांसोबत झालेल्या चकमकीत दोन माओवादी ठार झाले. बिजापूर जिल्ह्यातल्या बासुगुडा भागात केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या कोब्रा बटालियन आणि जिल्हा राखीव दलाने संयुक्त शोध मोहीम राबवली होती. या मोहिमेदरम्यान नेंद्रा जंगलात चकमक झाली. चकमकीनंतर सुरक्षा दलाने मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठी जप्त केला.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेला आज इ-मेलद्वारे बॉम्बची धमकी देण्यात आली आहे. रशियन भाषेत लिहिलेली इ-मेल बँकेच्या अधिकृत वेबसाईटवर पाठवण्यात आली आहे. या प्रकरणी माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. महिनाभरात ही दुसरी धमकी रिझर्व्ह बँकेला मिळाली आहे.

**<><><><><>**

जैश ए महंमद या दहशतवादी संस्थेच्या आठ राज्यातल्या १९ ठिकाणांवर काल रात्री एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेने छापे टाकले. या छाप्यांमधून बरीच आक्षेपार्ह कागदपत्रं, इलेक्ट्रॉनिक उपकरणं, पेन ड्राईव्ह, सीडी, हार्डडिस्क अशी सामग्री हस्तगत करण्यात आली आहे. जैश ए महंमद संघटनेचा दहशतवादी शेख सुलतान सलाउद्दीन अयुबी याच्या साथीदारांच्या ठिकाणांवरही छापे टाकण्यात आल्याचं एनआयएने सांगितलं आहे.

**//<><><><><>//**